# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ , अकोला

## कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि. वर्धा

### कृषि विषयक संदेश

**ऑगस्ट महिन्यात करावयाची कामे**

- सलग सोयाबीनमध्ये शाखीय वाढीसाठी फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये १५ पीपीएम जिब्रेलिक ॲसिडची म्हणजेच ८.३ ग्रॅम जिब्रेलिक आम्ल (९०% क्रियाशील घटक) प्रति हेक्टर ५०० लीटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.
- सोयाबीन पिक फुलोरा अवस्थेत येत असल्यास २ टक्के युरियाची फवारणी करावी.
- जास्त पावसामुळे शेतातून पाणी जास्त वाहिले असल्यास पाण्याबरोबर नत्र वाहून जाण्याची शक्यता असते. तुरीची खालची पाने पिवळी पडली असल्यास नत्राची कमतरता लक्षात घेऊन २ टक्के युरियाची (२०० ग्राम युरिया १० लीटर पाण्यात) फवारणी करावी.
- कपाशीचे पिक फुलोरावस्थेत असताना कपाशीवर २ टक्के युरिया किंवा २ टक्के डीएपी (२०० ग्राम १० लीटर पाण्यात) किंवा १९:१९:१९ (५० ग्राम १० लीटर पाण्यात) ४५ व्या व ६५ व्या दिवशी फवारणी करावी. तसेच फुलोरा अवस्थेत ०:५२:३४ (४० ग्राम १० लिटर पाण्यात) फवारणी करावी. फुलोरा अवस्था , पाते व बोंडे तयार होण्याच्या अवस्थेत १टक्का पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.
- सोयबीन पिकाची पट्टा पद्धतीने (६ ओळी सोयाबीन व त्यानंतर एक ओळ रिकामी) या सरी पाडून मुलस्थानी जलसंवर्धन करता येईल.
- दुसर्याप डवरणीच्या वेळी डवर्यादला दोरी गुंडाळून डवरणी करावी यामुळे पिकाच्या रांगेला मातीची भर बसेल व सर्या् पडल्यामुळे मुलस्थानी जलसंवर्धन होईल.
- पावसाळ्यात जनावरांना विषान्यूजन्य रोगांची लागवण होते. गेल्या काही महिन्यांपूर्वी लॅम्पी त्वचा रोगाचा प्रादुर्भाव होऊन सहा राज्यांमध्ये गुरे-ढोरे मृत्यूमुखी पडले. विशेषतः उष्ण व दमट हवामानात या रोगाचा प्रसार जास्त प्रमाणात होतो. या आजाराने बाधित झालेल्या जनावरांना डोके ,मान,पोट,पाठ,पाय तसेच शेपटी खाली त्वचेवर दोन ते पाच सेंटीमीटर व्यासाच्या गाठी येतात व काही दिवसांनी त्यामधून पास येतो. नाकाच्या व तोंडाच्या आतील भागामध्ये गाठी आढळून येतात. ग्रंथीला सूज येणे , पुढील व मागील पायावर सूज असणे व पोळीला सूज येणे अशीही लक्षणे प्रामुख्याने आढळू न येतात. तसेच ताप येतो , डोळ्यातून व नाकातून रक्तस्राव गळतो , भूक मंदावते हा आजार प्रामुख्याने सर्व वयोगटातील जसे संकरीत व देशी गाय, म्हैस वर्गातील पशुधनास होऊ शकतो.
- शेतकर्यांं नी या जनावरांना या रोगापासून वाचविण्यासाठी काळजी घेणे गरजेचे आहे. जनावरांनाचे शेड व जवळचा परिसर स्वच्छ ठेवावा. शेड जवळ पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी व मच्छर , गोमाशा तसेच गोचिड यांचा प्रादुर्भाव जनावरांना होऊ नये याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

KVKWARDHA

# कृषि सल्ला - पीक संरक्षण

## किडी:

सोयाबीन पिकावरील खोडमाशी (आर्थिक नुकसान पातळी १० टक्के प्रादुर्भावग्रस्त रोपे) व्यवस्थापनासाठी क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. २ मी.ली. किंवा इथिऑन ५० टक्के प्रवाही १५ मिलि. किंवा थायोमेथोक्झम १२.६ टक्के + लॅमडा सायहलोथ्रिन ९.५ टक्के @ २.५ मिलि किवा इंडोक्झाकार्ब १५.८ ई.सी. ६.६ मिलि किंवा क्लोरांट्रानिलीप्रोल ९.३० टक्के + लॅमडा सायहलोथ्रिन ४.६० टक्के @ ४ मिलि किंवा बीटासायफ्लूथ्रिन ८.४९ टक्के + इमिडाक्लोप्रीड १९.८१ टक्के @ ७ मिलि वरील पैकी कुठलेही एक किटकनाशक प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच चक्रीभुंगा (आर्थिक नुकसान पातळी फुलोरयापुर्वी ३ ते ५ चक्रीभुंगा प्रति मीटर ओळ) किडीच्या व्यवस्थापनासाठी क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. ३ मी.ली. किंवा इथिऑन ५० टक्के प्रवाही १५ ते ३० मिलि. किंवा थायोमेथोक्झम १२.६ टक्के + लॅमडा सायहलोथ्रिन ९.५ टक्के @ २.५ मिलि किवा इंडोक्झाकार्ब १५.८ ई.सी. ६.६ मिलि किंवा क्लोरांट्रानिलीप्रोल ९.३० टक्के + लॅमडा सायहलोथ्रिन ४.६० टक्के @ ४ मिलि किंवा बीटासायफ्लूथ्रिन ८.४९ टक्के + इमिडाक्लोप्रीड १९.८१ टक्के @ ७ मिलि प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पांढर्या माशीचा तसेच मावा तुडतुडे यांचा प्रादुर्भाव दिसल्यास त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पिवळे चिकट सापळे १५ x ३० से.मी. आकाराचे किवा तत्सम आकाराचे ६४ प्रती एकर याप्रमाणे लावावेत. तसेच ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

- ❖ उंटअळी व तंबाखूची पाने खाणारी अळीच्या व्यवस्थापणाकरिता लेबल क्लेम शिफारशीत इंडोक्झाकार्ब १५.८ ई.सी. @ ६.७ मिलि प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. उंटअळीच्या व्यवस्थापणाकरिता थायमेथोक्झाम १२.६ टक्के अधिक लॅम्बडा सायह्यालोथ्रीन ९.५ टक्के झे.सी. @ २.५ मिलि किवा क्लोरांट्रानीलिप्रोल १८.५ एस.सी. @ ३ मिलि प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

- ❖ कापूस पिकातील गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी कपाशीला पात्या लागण्यास सुरुवात झाल्यानंतर पिकामध्ये टेहाळणीसाठी एकरी 2 फेरोमोन सापळे याप्रमाणे लावणे, वेष्ठनावरील सुचणे नुसार विशिष्ट कलावधीत वडया (लुर) बदलाव्या व दर आठवड्याने पतंग मोजून नष्ट करावे. कपाशीला पात्या आल्यानंतर ७ ते ८ वेळा पिकामध्ये दर १० दिवसानंतर ट्रायकोग्रामा बॅक्ट्री या परोपजीवी मित्रकीटक असलेले ट्रायकोकार्ड एकरी ३ कार्ड कपाशीच्या शेतामध्ये सोडवित. फुलोरा अवस्थेत दर आठवड्याने गुलाबी बोंडअळीग्रस्त डोमकळ्या शोधून नष्ट कराव्यात. फुले व बोंड धरण्याच्या अवस्थेत ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझॅडीरेक्टिन ३०० पी.पी.एम. ५० मी.ली. किंवा वातावरणात पुरेशी आर्द्रता असतांना बिव्हेरिया बॅसीयाणा १.१५ टक्के डब्ल्यु. पी. ५० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच ५ ते १० टक्के प्रादुर्भावग्रस्त फुले (डोमकळ्या)/पात्या/बोंडे आढळल्यास थायोडीकार्ब ७५ टक्के डब्लु. पी. २० ग्रॅम किवा क्वीनोल फॉस २० टक्के ए.एफ. २५ मिलि किवा सायपरमेथ्रिन १० टक्के प्रवाही ७.६ मिलि किवा क्लोरांट्रानीलिप्रोल ९.३ टक्के + लॅमडा सायहलोथ्रिन ४.६ टक्के झेड.सी. @ ५ मिलि किंवा डेल्टामेथ्रिन १ टक्के + ट्रायझोफोस ३५ टक्के प्रवाही १० ते १२.५ मिलि किंवा क्लोरपायरीफोस + सायपरमेथ्रिन ५ टक्के @ १० मिलि वरीलपैकी कुठलेही एक कीटकनाशक १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

KVK WARDHA

- ज्वारी पिकातील खोडकीडीच्या व्यवस्थापनासाठी ज्वारीच्या पानावरील अंडीपुंज पानासाहित तोडून त्यांचा नायनाट करावा. खोडकीडीचे जैविक पद्धतीने व्यवस्थापनासाठी करण्याकरिता ट्रायाकोग्रामा चीलोनीस या परोपजीवी किटकाची अंडी १.५ लाख प्रति हेक्टरी पिक उगवणी नंतर ३० आणि ४० व्या दिवशी सोडवीत. खोडकीडीचा प्रादुर्भाव दिसताच कार्बोफ्युरॉन ३ टक्के दाणेदार ८.३ किलो प्रति हेक्टरी पोंग्यामध्ये द्यावे.

**रोग:**

- सद्यस्थितीत सतत पाऊस झाल्यामुळे शेतामध्ये साचलेले अतिरिक्त पाणी शेताच्या बाहेर काढावे.
- सोयाबीन पिकामध्ये मर आणि चारकोल रॉट रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून दोन किलो ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून एक एकर क्षेत्रात पसरवून मातीमध्ये मिसळावे.
- कापूस पिकावरील आकस्मित मर रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्राम अधिक १५० ग्राम युरिया १० लिटर पाण्यामध्ये मिसळून प्रादुर्भावग्रस्त झाडालगत साधारण १०० मि.ली. द्रावण पडेल याप्रमाणे बांगडी पद्धतीने देऊन झाडाचे खोड व्यवस्थित दाबून घ्यावे.
- तूर पिकातील मर रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून दोन किलो ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून एक एकर क्षेत्रात पसरवून मातीमध्ये मिसळावे.
- भाजीपाला पिकातील मर रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून दोन किलो ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून एक एकर क्षेत्रात पसरवून मातीमध्ये मिसळावे.

KVK WARDHA

**पोषणवाटिका आखणी**

खरीप हंगामातील पोषणबागेची आखणी पावसामुळे विलंबित झाली असल्यास पोळयानंतर रब्बी हंगामासाठी पोषणवटीकेची आखणी केल्यास भाजीपाला हंगामाच्या सुरवातिलाच उपलब्ध होऊ शकतो. पोषणवटीकेची आखणी घराभोवती उपलब्ध जागेनुसार , सूर्यप्रकाश, पाण्याचा निचरा होईल अशी जमीन बघून पूर्व व उत्तर दिशेस केल्यास उत्तम . जागा उपलब्ध जागेनुसार , सूर्यप्रकाश,पाण्याचा निचरा होईल अशी जमीन बघून पूर्व व उत्तर दिशेस केल्यास उत्तम जागा उपलब्ध नसल्यास. कुंडया , बादल्या, घमेले, टोपले यांचा वापर करून घरच्या छतावर ही कुटुंबाला पुरेसा होईल इतका भाजीपाला सहज घेता येईल.

बचतगटांमार्फत सामुदायिक पोषणवाटिकेची आखणी करायची झाल्यास गंगमा मॉडेलचा अवलंब करावा. गंगमापद्धतीने आखणी करताना वर्तुळाकार पोषणवाटीकेत एकूण 14 वाफे तयार होतात. यामध्ये रोज दोन भाज्या याप्रमाणे सात दिवस 14 वेगवेगळया भाज्या उपलब्ध होऊ शकतात तसेच बागेचे व्यवस्थापन करणे सोयीचे होते. या पद्धतीने आखणी करताना 30 फूट अंतर घेऊन बाहेरील वर्तुळ आखावा नंतर 18 फुटावर मधील वर्तुळ तर 6 फुटावर आतील वर्तुळ आखावा. वर्तुळाचे साडेतेरा फुटावर सात सारखे भाग पाडावे व दोन वाफयांमध्ये दीड फुटाचा रस्ता सोडावा.

अशाप्रकारे आखणी केल्यास एकूण 21 विविध भाज्या , कंपोस्ट खड्डा , फळझाडे एकाच नमुन्यात घेता येईल व बागेची व्यवस्थापन करणे सुलभ होते.

KVK WARDHA